**मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०६/०६/२०११ रोजी दुपारी ४.०० वाजता आयोजित जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त.**

| अ. क्र. | संस्था /कार्यालय | विषय | संबंधित कार्यालय | सभेतील निर्णय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | अध्यक्ष, एम आय डी सी औद्योगिक संघटना,चंद्रपूर.. | चंद्रपूर येथे उद्योग भवनाचे बांधकाम करणे बाबत | कार्यकारी अभियंता एमआयडीसी, नागपूर | चंद्रपूर येथील प्रस्तावीत उद्योग भवनाच्या सुरक्षा भिंतीचे बांधकाम काही प्रमाणांत पूर्ण झालेले असल्याचे उप अभियंता , म औ वि म , चंद्रपूर यांनी सभेत सांगितले. परंतु सदर कंत्राटदाराला स्ट्रक्चरल डिझाईन देण्यास विलंब झाल्यामुळे कंत्राटदार उद्योग भवनाचे बांधकाम करण्यास उत्सुक नसल्याचे उप अभियंता, म औ वि मं , चंद्रपूर यांनी सभेत निदर्शनास आणले. त्यावर मा. अध्यक्षांनी , अधिक्षक अभियंता , म औ वि मं, नागपूर यांचे सह सदर उद्योग भवनाच्या कंत्राटदारांनी मा. जिल्हाधिकारी यांची प्रत्यक्ष भेट घ्यावी असे निर्देश दिलेत . तसेच म औ वि म कडून कंत्राटदाराला स्ट्रक्चरल डिझाईन देण्यास का विलंब झाला याबाबत माहिती सादर करावी असे मा. अध्यक्षांनी निर्देश दिलेत. |
| २ | अध्यक्ष, एम आय डी सी औद्योगिक संघटना ,चंद्रपूर. | चंद्रपूर फ्लाय अॅश क्लस्टर विकासाबाबत सद्यस्थिती | कार्यकारी अभियंता, एमआयडीसी व प्रादेशिक अधिकारी , नागपूर- | अतिरिक्त चंद्रपूर औद्यागिक क्षेत्रात म औ वि म तर्फे फ्लाय अॅश समुहाच्या सामायीक सुविधा केंद्राकरीता ५ एकरचा भूखंड वाटप करण्यांत आलेला आहे. तसेच सदर भूखंडाच्या शेजारी एकूण ४२ भुखंडाचे सिमांकन करण्यांत आलेले असल्याचे क्षेत्र व्यवस्थापक, म औ वि म चंद्रपूर यांनी सभेत सांगितले. परंतु सदर अतिरिक्त चंद्रपूर वसाहतीमध्ये मुलभुत सोयी सुविधा नसल्यामुळे भूखंडा करिता उद्योजक अर्ज करीत नसल्याबाबत औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधींनी मा. अध्यक्षांचे निदर्शनास आणले. तसेच अतिरीक्त चंद्रपूर क्षेत्रात भुखंड वाटपा करिता ६ अर्ज प्राप्त झाले असुन भूखंड वाटप समिती च्या सभेमध्ये भूखंड वाटपाबाबत कार्यवाही करण्यात येईल असे क्षेत्र व्यवस्थाक, म ओ वि म , चंद्रपूर यांनी सभेत सांगितले. परंतु अतिरिक्त चंद्रपूर क्षेत्रातील मुलभुत सुविधा जसे रोड, नाल्या, इत्यादी पूर्ण झाल्या शिवाय उद्योग घटक सुरु करणे शक्य नसल्याचे औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधींनी सभेमध्ये मा. अध्यक्षांच्या निदर्शनास आणले. त्यावर उपअभियंता म ओ वि म चंद्रपूर यांनी सभेत सांगितले की, अतिरिक्त चंद्रपूर औद्योगिक क्षेत्रात मुलभुत सुविधा निर्माण करणेकरिता १०.६८ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करण्यात आला असल्याचे सभेत सांगितले, त्यावर मा. अध्यक्षांनी , अतिरिक्त चंद्रपूर औद्यागिक क्षेत्रातील मुलभुत सुविधा बाबत लवकरात लवकर कार्यवाही व्हावी या अनुषंगाने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी , म औ वि म , मुंबई यांना |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | अर्धशासकीय पत्र पाठवावे असे मा. अध्यक्षंनी निर्देश दिलेत. |
| ३ | जिल्हा औद्योगिक संघटना, चंद्रपूर | वेकोफिचा भूमीगत रिकाम्या खाणी मध्ये बाटम ॲशने भरण्याबाबत | मुख्य महाव्यवस्थापक वेकोफि चंद्रपूर व मुख्य महाव्यवस्थापक, सी टी पी एस चंद्रपूर | वेकोलिच्या भूमीगत रिकाम्या खाणी मध्ये बाटम ॲशने भरण्याबाबत च्या चर्चे दरम्यान वेकोलिच्या उपस्थित प्रतिनिधींनी सांगितले की, बॉटम ॲश भरणेबाबत टेंडर मंजुर झालेले असुन पुढील आठवड्यांत बॉटम ॲशने भरण्याचे काम सुरु करण्यांत येईल . त्यावर मा. अध्यक्षांनी निर्देश दिलेत की, वेकोलिच्या वेकोलिच्या भुमिगत खानी मध्ये बॉटम ॲशने भरण्याबाबत कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. अध्यक्षांना सादर करावा. |
| ४ | चांदा को-ऑप औद्योगिक सहकारी वसाहत चंद्रपूर | अ) बंगाली कॅम्प ते मच्छी-नाला पर्यंत येणा-या मुख्य रस्त्या वरील डावी कडील नााल्याची रुंदी वाढविण्या बाबत<br>ब) वसाहतीतील मूलभुत सोई व सुविधाकडे विशेष लक्ष देण्याबाबत | मुख्याधिकारी - नगर परिषद, चंद्रपूर | चांदा औद्योगिक सहकारी वसाहती मधील मुलभुत सोयी सुविधा बाबतच्या चर्चे दरम्यान मा. अध्यक्षांनी निर्देश दिलेत की, औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधींनी केंद्र शासनाच्या योजने मध्ये सादर करावयाचा प्रस्ताव तयार करुन सादर करावा व त्यानंतर सदर प्रस्ताव जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर मार्फत शासनास सादर करण्यांत येईल.<br>तसेच सध्यास्थितीत आवश्यक असलेल्या कामाकरिता पंचशताब्दी निमीत्त प्राप्त होणा-या तरतुदी मधुन चांदा औद्योगिक को-ऑप. वसाहत मधील मुलभुत सुविधेकरिता निधी प्राधान्याने देण्यांत येईल . त्याकरिता मुख्याधिकारी, नगर परिषद , चंद्रपूर यांनी प्रस्ताव तयार करुन मा. जिल्हाधिकारी , चंद्रपूर यांना सादर करावा असे निर्देश दिलेत. |
| ५ | अध्यक्ष, एम आय डी सी औद्योगिक संघटना ,चंद्रपूर.. | वरोरा एमआयडीसी मध्ये वापर करण्यात आलेल्या भूखंड धारकांच्या ताब्यात भूखंड देण्याबाबत येणारी अडचण | क्षेत्र व्यवस्थापक, एमआयडीसी, औद्योगिक संघटना | वरोरा एमआयडीसी मध्ये वापर करण्यात आलेल्या भूखंड धारकांच्या ताब्यात भूखंड देण्याबाब येणा-या अडचणी बाबतच्या चर्चे दरम्यान क्षेत्र व्यवस्थापक,म औ वि म , चंद्रपूर यांनी सभेत सांगितले की, वरोरा म औ वि मं मधील प्लॅाट धारकांचा विषय निकाली निघाला असुन प्लॅाट धारकांना बांधकाम करणेबाबत कळविण्यांत येईल , त्यावर मा. अध्यक्षांनी सदर विषय हा विषय सुचीवरुन वगळण्यात यावा असे निदर्श् दिले. |
| ६ | अध्यक्ष, जिल्हा औद्योगिक संघटना, चंद्रपूर | सुक्ष्म व लघु सिमेंट उद्योगांना फ्लाय ॲश मिळणेबाबत | सी टी पी एस., चंद्रपूर. | श्री मुकेश राठोड, सचिव ,फ्लाय ॲश ब्रिक्स इंडस्ट्रीज असोशिएशन , चंद्रपूर यांनी सध्या सुक्ष्म व लघु उद्योजकांना सी टी पी एस चंद्रपूर येथे राखेचा नियमि पुरवठा होत असल्याचे सभेत सांगितले. सदर विषय हा विषय सुचीवरुन वगळण्यात यावा असे मा. अध्यक्षांनी निर्देश दिलेत. |
| ७ | जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर | जिल्हा पुरस्कार योजने अंतर्गत उद्योजकांची निवड | | जिल्हा पुरस्कार योजने अंतर्गत सन २०१० करिता उद्योजकाची पुरस्कारा करिता निवड करण्यांत आलेली असल्याचे महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | करणेबाबत. | | केंद्र, चंद्रपूर यांनी सांगितले. त्यावर मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी निर्देश दिले की, सदर पुरस्कारचे वितरण १५ ऑगष्ट २०११ रोजी मा. पालकमंत्री , चंद्रपूर यांचे हस्ते करण्यात यावे. तसेच त्याबाबतचा प्रस्ताव ४ दिवसाचे अगोदर जिल्हाधिकारी यांना सादर करावा व सदर विषय हा विषय सुचीवरुन वगळण्यात यावा असे निर्देश दिले. | |
| ८ | वेळेवर येणारे विषय<br>१. अध्यक्ष, एम आय डी सी इंडस्ट्रीअल असो., चंद्रपूर. | चंद्रपूर औद्योगिक क्षेत्राकरिता नियमित पाणीपुरवठा होणेकरिता रॅडिअल वेल निर्माण करणेबाबत. | कार्यकारी अभियंता, म ओ वि म , नागपूर. | सन २००९-१० मध्ये चंद्रपूर औद्योगिक क्षेत्रामध्ये उद्योग घटकांना नियमित पाणीपुरवठा न झाल्यामुळे ब-याच उद्योगांना आपले उत्पादन बंद करावे लागले असल्यामुळे उद्योजकास नुकसान सहन करावे लागले. ही परिस्थीती पुन्हा निर्माण होवू नये , तसेच चंद्रपूर औद्योगिक क्षेत्रामध्ये येणा-या नविन उद्योगामुळे पाण्याची आवश्यकता निश्चितच वाढणार असल्याने औद्योगिक क्षेत्रात येणा-या उद्योगास व सुरु असलेल्या उद्योगास पाणीपुरवठा नियमित व्हावा या अनुषंगाने वर्धा नदीमध्ये रॅडीअलवेल निर्माण करणे गरजेचे असल्याचे सभेमध्ये सांगितले. त्यावर उप अभियंता, म औ वि मं यांनी रॅडीअल वेलचा प्रस्ताव तयार केलेला असुन वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यांत आलेला आहे, असे सभेत सांगितले. त्यावर मा. अध्यक्षांनी निर्देश दिलेत की, मा. मुख्यकार्यकारी अधिकारी, म औ वि मं, मुंबई यांना अर्धशासकीय पत्राने वरील काम लवकरात लवकर पूर्ण करण्याविषयी विनंती करण्यांत यावी असे निर्देश दिलेत. | |

शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानुन मा अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर करण्यांत आले.

Sd/-
अध्यक्ष
जिल्हाउद्योग मित्र समिती तथा
जिल्हाधिकारी,चंद्रपूर.

sd/-
सदस्य सचिव
जिल्हा उद्योग मित्र समिती तथा महाव्यवस्थपक
जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.